महाराष्ट्र शासन

# उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालय, अलिबाग

"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" मु.पो.हिराकोट तलावाजवळ अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड पी.नं. 402 201
दूरध्वनी क्र 02141-222016/222216 Email ID:dycfalibag@mahaforest.gov.in

जावक क्रमांक: ब/20/जमिन/वसं/ 1327 /2022-23. दिनांक: 6 /07/2022

प्रति,

कार्यकारी अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग विभाग,
पेण रायगड पिन नं.402 107.

विषयः- **वन जमिन रायगड**
पेण - खोपोली - महड (0.000 कि.मी ते 33.329 कि.मी.) सेक्शन ऑफ एनएच-166 डी मधील रस्त्याचे रुंदीकरणाकरीता वनजमिन मागणी प्रस्ताव ...

संदर्भः- 1) आपले कडील पत्र क्र. रामवि/पेण/प्रशा 5/पेण खोपोली/2106, दि. 08/10/2020
2) या कार्यालयाकडील पत्र क्र.ब/20/जमीन/2154, दि.25/11/2020
3) आपले कडील पत्र क्र.NHD/Pen/PKM/Forest/PB-5/2409 Date-23/11/2020.
4) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/2732, दिनांक 24/12/2020.
5) आपले कडील पत्र क्र. NHD/Pen/PKM/Forest/PB-5/835, दि. 23/04/2021.
6) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/वसं/569, दिनांक 24/05/2021.
7) या कार्यालयाकडील स्मरणपत्र क्र. ब/20/जमिन/वसं/757, दिनांक 03/06/2021.
8) आपले कडील पत्र क्र. NHD/Pen/PKM/Forest/PB-5/1111, दि. 17/06/2021.
9) या कार्यालयाकडील स्मरणपत्र क्र. ब/20/जमिन/वसं/1299, दिनांक 10/07/2021.
10) आपले कडील पत्र क्र. NHD/Pen/PKM/Forest/PB-5/1842, दि. 21/10/2021.
11) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/वसं/4290, दिनांक 28/01/2022.
12) आपले कडील पत्र क्र. NHD/Pen/Forest/PB-5/488, दि. 25/03/2022.

पेण - खोपोली - महड (0.000 कि.मी ते 33.329 कि.मी.) सेक्शन ऑफ एनएच-166 डी मधील रस्त्याचे रुंदीकरणाकरीता वनजमिन मागणी प्रस्तावात आपणाकडील संदर्भिय पत्र क्र. 12 अन्वये पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करणेत आलेला आहे. तथापी सदर प्रस्ताव ऑनलाईन PARIVESH.NIC.IN या संकेतस्थळावर अद्याप प्रस्ताव या कार्यालयाचे स्तरावर प्राप्त झालेला नाही.

सदर प्रस्तावची छाननी केली असता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत.

1. प्रस्तावित आखणी मार्गात बाधीत होणारे मौजे रामराज, आंबेघर, सापोली, पिंपळगांव, गागोदे खुर्द, ता. पेण व मौजे करंबेळी तर्फे छातिशी, रानसई, होराळे, आपटी, डोणवत, तांबाटी, दहिवली तर्फे बेरेटी, वडवळ, ता. खालापरू गावात समाविष्ट असलेले वनक्षेत्र त्याचे वैधानिक दर्जानिहाय क्षेत्र दर्शविलेले नाही ते दर्शविणे आवश्यक आहे.

2. प्रस्तावात आखणी मार्गात बाधीत होणारे मौजे तारणखोप गावाचा नवीन/जुना गाव झल्याचे फेरफार/सुची तपशील सादर करणे आवश्यक आहे.

3. मौजे तारणखोप, ता. पेण येथील सर्व्हे क्रमांक 32 मधून रस्ता दर्शविलेला आहे. परंतु सर्व्हे क्रमांकाचे क्षेत्र क्षेत्रविवरण तक्तयांत नमुद केलेले दिसून येत नाही.

4. मौजे धावटे मधील सर्व्हे नंबर 16 मधून रस्तयाचा आखणी मार्ग बाधीत होत नाही. परंतु क्षेत्र विवरण तक्त्यामध्ये नमूद केल्याचे दिसून येत नाही. तरी याबाबत खात्री होणे आवश्यक आहे.

5. मौजे धावटे, ता. पेण मधील सर्व्हे नंबर 40, 11, 79, 72, चे रस्तयामधून जात आहे. परंतू क्षेत्र विवरणामध्ये नमूद केलल्याचे दिसून येत नाही. तरी याबाबत खात्री होणे आवश्यक आहे.

6. मौजे. सावसरसई ता. पेण सर्व्हे नंबर 7 चा पोट हिस्सा नकाशा सादर करणे आवश्यक आहे.

7. मौजे सावरसई, ता. पेण संपादित वन सर्व्हे नंबर 7 चे लगत उजव्या बाजुला आखणी मार्गाची मार्कींग दिसून येत नाही. तरी याबाबत खात्री होणे आवश्यक आहे.

8. मौजे कामार्ली, ता. पेण येथील राखीव वन सर्व्हे क्रमांक 44 मधून जात आहे. सदर डाव्या बाजूच्या रस्तयाची लांबी क्षेत्र विवरण तक्त्यामध्ये 565 मीटर दिसून येत आहे. परंतू नकाशाप्रमाणे माजली असता 620 मीटर असल्याचे दिसून येत आहे. तरी यबाबत खात्री होणे आवश्यक आहे.

9. मौजे आंबिवली-आजिवली गावाचे मुळ महसूल गांव नमुद करणे आवश्यक आहे.

10. प्रस्तावित आखणी मार्गात बाधीत होणा-या क्षेत्रात जुना /नवीन वाढीव महसूली गांव निर्माण झाल्यास त्याचा तपशील सादर करणे आवश्यक आहे.

11. चेक लिस्ट मुद्दा क्रमांक 2a(iii),(v),(vi) त्याची पुर्तता केल्याचे दिसून येत नाही.

12. प्रकल्पयंत्रणेकडून प्रस्तावित आखणी मार्गात बाधीत होणा-या प्रत्येक गाव नकाशावर रस्त्याचा आखणीमार्ग चेनेजवार दर्शवून स्वतंत्र नकाशे सादर करणे आवश्यक आहे.

13. प्रस्तावित आखणी मार्गात बाधीत होणा-या गावांचे Geo Digital Map स्वतंत्र जोडणे आवश्यक आहे.

14. 1:50000 या प्रमाणातील टोपोशीट काशवर नियोजीत आखणी मार्गापासून नजीकचे अभयारण्याचे व पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (ESZ) क्षेत्राचे अंतर दर्शविलेले नाही. ते दर्शविणे आवश्यक आहे.

15. प्रस्तावासोबत वन जमिन मागणी सुधारीत KML File/Shape File ची CD जाडलेली नाही. तरी त्याची पूर्तता होणे आवश्यक आहे.

16. तसेच प्रस्तावित गावाची यादी साक्षांकी प्रमाण नुसार जोडणे व गाव नकाशावर साक्षांकी प्रमाणेच दर्शविणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाकडील अभिलेख हा जुन्या सर्व्हे नंबर प्रमाणे आहे व प्रस्तावासोबत जोडलेले गाव नकाशे नवीन गट नंबर प्रमाणे आहेत. त्यामुळे प्रस्तावामध्ये समाविष्ट गट नंबरचे भूमि अभिलेख विभागाकडील साक्षांकीत गट एकत्रिकरण योजना व महसूल अधिकार अभिलेखातील 7/12 उतारे प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे.

17. प्रस्तावांत 1 ते 57 बाबींची परिपूर्ण चेकलिस्ट सामील करणेबाबत कळविण्यता आले होते तथापी त्याची पूर्तता करणेत आलेली नाही.

18. प्रस्तावांत सामील करण्यात आलेले 7/12 उतारे हे संबंधीत प्राधीकरणाकडून/ऑनलाईन प्रणालीवरुन प्राप्त केलेले प्रमाणीत असणे (डीजीटल स्वाक्षरीचे) सामील करणेबाबत कळविण्यात आलेले होते तथापी याबाबत पूर्तता करणेत आलेली नाही.

19. प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवर या कार्यालयाचे स्तरावर सादर करणेत आलेला नसल्याने त्याबाबत पडताळणी करता आलेली नाही. यापुढे प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवर सादर करुनच त्याची हार्डकॉपी संच या कार्यालयास सादर करणेची दक्षता घ्यावी. याबाबत कळविण्यात आलेले होते तथापी त्याची पूर्तता करणेत आलेली नाही. .

20. फार्म नं. अ- भाग-1 मध्ये Cost of the project नमुद करणेबाबत कळविण्यात आलेले होते. तथापी त्याची पूर्तता करणेत आलेली नाही.

21. प्रस्तावाचे फार्म-अ भाग-1 मध्ये **Purpose wise breakup** विहित प्रपत्रांत देण्यात आले नाही. तरी खालील प्रपत्रांत क्षेत्र विवरण तक्ता देण्यात यावा. याबाबत कळविण्यात आलेले होत तथापी त्याची पूर्तता करणेत आलेली नाही.

22. सुधारीत प्रस्तावांत क्षेत्र विवरण तक्ता सामील करणेत आलेला दिसून येत नाही. तरी यापूर्वी उपस्थित करण्यता आलेला (मुददा क्र. 14- प्रस्तावांतील क्षेत्र विवरण तक्तयामध्ये समाविष्ट होणारे गावाचे जुने सर्व्हे नंबरचा तपशील व त्याकरीता त्या त्या गावाची गट एकत्रिकरण योजना उपलब्ध करुन देण्यात यावी जेणेकरुन त्यात्या गावांमधील खाजगी वनाचे क्षेत्राबाबत खात्री करुन ते प्रस्तावांतील आखणी मार्गात बाधीत होत आहे अगर कसे? याबाबत खात्री करता येईल. तसेच क्षेत्र विवरण तक्त्यायावर प्राधिकृत अधिकारी यांचे नांव व स्वाक्षरीसहित ऑफीसियल सिल असणे आवश्यक आहे. ) प्रमाणे पूर्तता करुन क्षेत्र विवरण तक्ता प्रस्तावांत सामील करणेबाबत कळविण्यात आलेले होते तथापी याची देखील पूर्तता करणेत आलेली नाही.

23. प्रस्तावात वन हक्क अधिनियम, 2006 अंतर्गत विहित प्रपत्रांतील जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील प्रमाणपत्र व त्या अनुषंगीक दस्तऐवज आंग्ल भाषेत भाषांतरीत करुन प्रस्तावांत सामील करणे आवश्यक असल्याबाबत कळविण्यात आलेले आहे. याबाबत पूर्तता करणे आलेली नाही.

एकूण एकंदरीत प्रस्तावात त्रुटींची पूर्तता न करताच प्रस्ताव फेर या कार्यालयास सादर केलेला दिसून येत आहे. तरी परिपूर्ण व त्रुटी रहित प्रस्ताव सादर केला जाईल जेणे करुन त्याच त्याच त्रुटी प्रस्तावांत उपस्थित होऊन आपले कार्यालयाचा व या कार्यालयाचा वेळ वाया जाणार नाही याची दक्षता घेणेत यावी.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव ऑनलाईन व ऑफलाईन प्रस्तावाचे 8 संचामध्ये तयार करुन या कार्यालयास सादर करणेची कार्यवाही करावी. तसेच ज्या ज्या वन परिक्षेत्रांतून सदर रस्ता जाणार आहे त्या त्या वन परिक्षेत्र अधिकारी यांना त्यांचे परिक्षेत्रातील आखणी मार्गाची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

(आशिष ठाकरे, भा.व.से.)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, पनवेल व अलिबाग यांचेकडे माहितीसाठी रवाना.

प्रतः- वन परिक्षेत्र अधिकारी, पेण व खालापूर यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

2/- त्यांनी उक्त प्रस्तावांमध्ये प्रकल्प यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारचा वनभंग झाला आहे किंवा कसे? याबाबत खात्री करुन अहवाल सादर करावा. तसेच प्रस्तांवातील वनक्षेत्रांत वृक्षतोड होणार आहे किंवा कसे? याबाबत खात्री करुन वृक्षतोड होणार असेल तर त्याबाबत वृक्षतोडीचे अंदाजपत्रक तयार करुन या कार्यालयास सादर करावा. तसेच प्रस्तूत प्रस्तावांत पर्यायी वनीकरणाकरीता दुप्पट अवनत वनक्षेत्र प्रस्तावीत करुन त्याचे नकाशे, पर्यायी वनीकरणाची योजना, क्षेत्र वनीकरणाकरीता सुयोग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र इ. माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी

प्रतः- सर्व्हे कक्ष यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.